# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. ३५, वर्ष Year २०१८, दिनांक Date २६/३/२०१८

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. कलमे Sections ७, १२
(ii) अधिनियम Act १९८८, सुधारित २०१८ कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ...... तारीख पासून Date from २३/०३/१८ वेळ Time ...... तारीख पर्यंत Date to २६/३/१८ वेळ Time ......
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याचा Information received at P.S. तारीख Date ...... वेळ Time ......
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ८, तारीख Date २६/३/१८, वेळ Time ०९:३५

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ...... चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ......
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name रेल्वे पोलिस मुख्यालयाच्या शेजारी Ambe Arm सेंटरच्या बाजूला रिक्षा स्टॅण्डजवळ मोकळ्या जागेत, ठिकाणाचा नंबर No. if any ...... गल्ली Ward ...... रस्त्याचे नाव Name of road ......
जवळचे ओळखीचे चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... तालुका Taluka ...... जिल्हा Distt. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
(c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ...... तालुका Taluka ...... जिल्हा Distt. ...... राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name नारायण उर्फ योगेश वाकोडे (b) वडीलांचे / पतीचे नाव Father's /Husband's Name मनोहर वाकोडे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age २५ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८६९८७६९८९०
(e) पारपत्र क्रमांक Passport No. — दिल्याचा दिनांक Date of Issue — दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation —
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता : Address : ...... गल्ली / वार्ड नं. Ward ...... घर / नाव नंबर House/Name No. ...... फोन /मो. नंबर Phone/M. No. ...... पॅन नं. Pan No. ...... कोर्ड नं. Card No. ......
रस्त्याचे नाव Road ...... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... पो. स्टे. P. Stn. ......
तालुका Taluka ...... जिल्हा Distt. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address इंद्राबाई कॉलनी, प्रधान नगर, रूम क्र. ३६३, घाटकोपर (प.) मुं.-७५

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

लोकसेवक- श्रीकांत पोपटराव वडडे, ३५ वर्षे, (कनिष्ठ अभियंता) इमारत व कारखाने विभाग, एन वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, घाटकोपर (प.) मुंबई व खाजगी इसम आलम कदम, पूर्ण नाव पत्ता माहित नाही.

पान

फिर्याद

दिनांक–२६/०३/२०१९.

श्री. नारायण उर्फ योगेश मनोहर वाकोडे, वय २५ वर्षे, धंदा–नाही, रा.ठि.– रामाबाई कॉलनी, प्रभात नगर, रूम नं.१८३, घाटकोपर (पुर्व), मुंबई ४०००७५. मोबाईल नं. ७६६६७६९९९७, ८८९८३१५८०६.

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझ्या जन्मापासून कुटूंबासमवेत राहावयास आहे. माझे कुटूंबात माझे आई–वडिल, आजी असे रहावयास आहेत. मी रहात असलेली खोली ही माझे वडिलो पार्जित आहे. मी सध्या नोकरी नसल्याने घरीच असतो.

मी रहात असलेल्या रमाबाई कॉलनी, प्रभात नगर, रूम नं.१८३, घाटकोपर (पुर्व), मुंबई या बैठ्या घरामध्ये माझे घराचे  शेजारी असलेल्या गटाराचे पाणी, माझे रूमच्या भिंतीमधून व लादीतून येत असल्यामुळे घराची पुर्नबांधणी करीत होतो. दि.१९/३/२०१९ रोजी घराचे बांधकाम करीत असलेले ठेकेदार माझा मित्र श्री रितेश पद्मशाली हा बांधकाम चालू असलेल्या घराचे ठिकाणी साधारण १३.०० वा.चे दरम्यान हजर असताना म.न.पा. एन वार्डचे अधिकारी वरूडे हे आमचे काम चालू असलेल्या ठिकाणी आले व त्यानी सांगितले की, "तुम्हाला परवानगी शिवाय बांधकाम करता येणार नाही. जर तुम्ही मला रू.४०,०००/– दिले तर तुम्हाला कोणत्याही परवानगीची आवश्यकता भासणार नाही सर्व काही मी पाहून घेईन " असे सांगितले.

त्यानंतर दि.२३/०३/२०१९ रोजी म.न.पा. अधिकारी वरूडे हे पून्हा आमचे बांधकाम चालू असलेल्या आमचे घराचे ठिकाणी आले व त्यांनी रू.२५,०००/– ते ३०,०००/– रूपयाची मागणी करून सदरची रक्कम त्यांनी त्यांचा मध्यस्थी इसम यांचा फोन येईल त्यावेळी मध्यस्थी इसमाकडे देण्याकरीता सांगितले. परंतू माझी मनपा अधिकारी श्री.वरूडे यांना कोणत्याही प्रकारची लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २३/०३/२०१९ रोजी दुपारी ०३:३० वाजताचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथील कार्यालयात मनपा अधिकारी श्री.वरूडे यांचेविरूध्द तक्रार देण्याकरीता गेलो. त्यावेळी पोनि वळवी यांनी मनपा अधिकारी श्री.वरूडे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज स्वहस्त:क्षरात लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली व पोनि वळवी यांनी मला पुन्हा मनपा अधिकारी श्री.वरूडे किंवा त्यांच्या मध्यस्थाचा जर फोन आला तर तु लागलीच कार्यालयात ये नाहीतर दि. २५/०३/२०१९ रोजी कार्यालयास ये असे सांगीतले.

मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात दिलेल्या तक्रार अर्जाचे अनु  ंगाने पो.नि. वळवी यांनी दिनांक २५/०३/२०१९ रोजी बोलाविल्याने मी दुपारी १२:०० वाचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात हजर झालो व पो.नि. वळवी यांची भेट घेतली.

त्यानंतर पोनि वळवी यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यावर पोनि वळवी यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून माझा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पंचांनी माझा तक्रार अर्ज वाचल्या नंतर पोनि वळवी यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर पंचांनी स्वाक्षरी करून पोनि वळवी यांनी स्वत: स्वाक्षरी केली व माझा तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

समक्ष ,

( जगदिश वळवी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

INSPECTOR OF POLICE
ANTI-CORRUPTION BUREAU

Vaakode

त्यानंतर पोनि वळवी यांनी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर काही वेळाने मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात असताना माझे मोबाईलवर एका इसमाचा फोन आला असता मी सदर इसमास कोण बोलत आहात याबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे नाव अनिल कदम असे सांगून वरूडे साहेबांनी फोन करण्यास सांगितले वरून फोन केला आहे असे सांगितले तेव्हा मी श्री कदम यांना बाहेर असल्याचे सांगून दोन ते तीन तासाने घाटकोपर रेल्वे पोलीस वसाहत येथे आल्यानंतर फोन करून भेटतो असे सांगितले व फोन कट केला.

त्यानंतर पो.नि. वळवी, स.पो.आ. विजयकर, पंच, तसेच पडताळणी पथक पडताळणी कारवाईकामी आवश्यक साधनसामुग्री सोबत घेऊन आम्ही पडताळणीकरीता घाटकोपर पोलीस वसाहत येथे आलो. त्यावेळी साधारण ०४:०० वाजले होते. पो.नि. वळवी यांनी मला, पंच व पथकातील अंमलदारांना पडताळणीचे वेळी घ्यावयाचे दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या. पो.नि. वळवी यांनी सांगितल्या प्रमाणे मी मनपा अधिकारी वरूडे यांचा मध्यस्थी इसम नामे श्री अनिल कदम यांचा मो.क्र.९०८२४९४५६८ वर पंचासमक्ष फोन केला व त्यांना घाटकोपर येथे पोहचल्याबाबत सांगून भेट कोठे घ्यावयाची बाबत विचारले असता श्री कदम यांनी सांगितले की, घाटकोपर रेल्वे पोलीस वसाहत येथे येवून भेटू असे सांगितले.

काही वेळानंतर पो.नि. वळवी यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तो माझे शर्टाच्या आतील बनियानला आतील बाजुस लावून पोनि वळवी यांनी सांगितल्या प्रमाणे पंचांसोबत खाजगी इसम श्री कदम यांची भेट घेण्यास ठरलेल्या ठिकाणी पायी चालत गेलो. सदर ठिकाणी पोहचल्यानंतर त्या ठिकाणी श्री कदम हे हजर नसल्याने मी श्री. कदम यांना फोन केला व मी रेल्वे पोलीस वसाहत येथे पोहचलो असलेबाबत कळविले. त्यावेळी श्री कदम यांनी ते थोडयाच वेळात सदर ठिकाणी पोहचत आहे असे सांगून फोन कट केला. थोडयाच वेळात श्री कदम हे सदर ठिकाणी आले. त्यावेळी मी त्यांना भेटून विचारले की, वरूडे साहेब आले आहेत का? त्यांचेशी देण्या–घेण्या विषयी बोलावयाचे होते. त्यावेळी कदम यांनी त्यांचे मोबाईलवरून वरूडे साहेबांना फोन केला असता, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यावेळी कदम यांनी फिर्यादी यांना सांगितले की,एका रूमचे पाच हजार रूपये देतात. असे तुम्ही दोन रूमचे १०,०००/–हजार रू.देवून टाका मी तुमच्या दोघांमधला दुवा आहे असे सांगून तो त्यांना प्रोत्साहन देत आहे. दिनांक २६/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. वरूडे साहेब यांचेशी भेट करून देतो असे सांगितले व श्री कदम निघून गेले.

त्यानंतर मी व माझे सोबत असलेले पंच असे वाहनाजवळ आलो. तेथे सदर ठिकाणी पो.नि. वळवी व स.पो.आ. विजयकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून संभाषण ऐकले व त्याची ट्रान्सस्क्रिप्ट लाप्रवि कार्यालयात

समक्ष ,

( जगदिश वळवी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

INSPECTOR OF POLICE
ANTI-CORRUPTION BUREAU

Vaakode

गेल्यावर तयार करण्यात येईल असे सांगून, पो.नि. वळवी यांनी मला पुढील पडताळणी/सापळा कारवाईकामी दि. २६/०३/२०१९ रोजी ११.०० वा. परस्पर रेल्वे पोलीस वसाहत, घाटकोपर, मुंबई येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

पो.नि वळवी यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक २६/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता परस्पर रेल्वे पोलीस वसाहत, घाटकोपर पूर्व, मुंबई येथे हजर झालो. त्यावेळी पो.नि. वळवी, स.पो.आ. विजयकर व त्यांचे पथक व पंच हे सदर ठिकाणी हजर होते. पो.नि. वळवी यांनी मला दि. २५/०३/२०१९ रोजी असलेले पंच श्री रामचंद्र बालाजी पोतदार यांना निवडणुकी संबंधी प्रशिक्षण असल्याने ते येणार नाहीत त्यांचे ऐवजी श्री. अरूण जानु दिंडे, वय ४६ वर्षे हे आल्याचे सांगून त्यांची ओळख करून दिली. पो.नि. वळवी यांनी सांगितले की, दिनांक २५/०३/२०१९ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे खाजगी इसमामार्फत लाचेची स्पष्ट मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व कारवाई करण्यात येत असल्याबाबत मला, पंचाना व पोलीस पथकातील अमंलदार यांना सांगून सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या व पोलीस वाहनातच दोन पंचासमक्ष माझी अंगझडती घेवून माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १०,०००/— (रू. ५००/— दराच्या २० भारतीय चलनी नोटा) घेतल्या व उर्वरीत अंगझडतीतील रक्कम व इतर चिजवस्तु माझे ताब्यात दिल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पो.नि. वळवी यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर इशारा म्हणून मी माझ्या पॅन्टच्या खिश्यातील हात रूमाल काढून तोंड पुसुन पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा इशारा करण्यास सांगितले.

पो.नि. वळवी यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे समोर धरला त्यावेळी ११.३० वाजले होते. त्यानंतर मी माझे मोबाईल स्पिकर मोडवर घेवून त्यांनी खाजगी इसम अनिल कदम यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता, श्री कदम यांनी सांगितले की, ते अंधेरी येथे जात आहे. दोन ते तीन तास लागतील असे सांगून ते परत आल्यावर श्रीकांत साहेबांची भेट घेवू असे सांगून फोन कट केला.

त्यानंतर थोडया वेळाने मनपा अधिकारी श्रीकांत वरूडे यांचा मला माझे मोबाईलवर फोन आला त्यावेळी तात्काळ मी माझा मोबाईल स्पिकर मोडवर ऑन करून व्हॉईस रेकॉर्डर चालू केला त्यावेळी त्यांनी लंच टाईम झाला असून बीएमसी एन वॉर्ड येथे मला भेटण्यास बोलविले व फोन कट केला.

त्यानंतर थोडयावेळाने माझे शर्टाच्या आतील बनियानला आतील बाजुस असलेला व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावण्यात आला आणि मी व पंच श्री. चव्हाण असे एन वॉर्ड येथे जाण्यास निघालो आम्ही एन वॉर्ड येथे गेल्यावर आम्हाला मनपा अधिकारी वरूडे हे दिसून न आल्याने वरूडे यांनी माझे मोबाईलवर फोन केला व मला पंतनगर पोलीस ठाणेच्या समोर उभा आहे असे सांगून फोन कट केला. त्याप्रमाणे आम्ही एन वॉर्ड

समक्ष ,

( जगदिश वळवी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

INSPECTOR OF POLICE
CORRUPTION BUREAU

Vaakode.

येथून पंतनगर पोलीस ठाणे येथे भेटण्यास गेले. थोडयावेळाने मनपा अधिकारी वरूडे यांनी माझे मोबाईलवर फोन करून कोठे पोहचलात असे विचारले असता मी त्यांना रिक्षात असल्याचे सांगून लवकरच पंतनगर पोलीस ठाणे येथे पोहचत असल्याचे सांगितले. त्यावेळी वरूडे यांनी थोडे पुढे येण्यास सांगून फोन कट केला. त्याप्रमाणे मी व माझे सोबत असलेले पंच श्री. चव्हाण यांनी थोडे पुढे येवून मनपा अधिकारी वरूडे यांची भेट घेतली. त्यावेळी मी वरूडे यांचेशी कामाची बोलणी करून लाचेची रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी वरूडे यांनी रमाबाईनगर येथील एटीएम सेंटर येथील चप्पल वाल्याकडे सदर लाचेची रक्कम देण्यास सांगितले व ते निघून गेले.

त्यानंतर मनपा अधिकारी वरूडे यांनी माझे मोबाईलवर सुमारे १६.३९ वा. फोन केला परंतु मी गाडीवर असल्याने फोन घेतला नाही. त्यानंतर मी माझा मोबाईल स्पीकर मोडवर ठेवुन मनपा अधिकारी वरूडे यांना फोन केला असता त्यांनी ''मी रेल्वे पोलीस वसाहत मध्ये आहे. तुम्ही किती वेळात पोहोचणार असे विचारले असता मी त्यांना पाच मिनीटांत पोहोचतो असे सागितले. व फोन कट केला.

त्यानंतर पो.नि. वळवी यांनी माझे शर्टाच्या आतील बनियानला आतील बाजुस व्हॉईस रेकॉर्डर लावून तो चालू करून पंच श्री चव्हाण यांचेसह जाण्यास सांगितल्याने मी व पंच श्री. चव्हाण असे माझे अॅक्टीव्हा टु व्हिलर गाडीवर रवाना झालो. माझ्या अॅक्टीव्हा वाहनाच्या मागे काही अंतरावर वाहने पोलीस पथकासह रेल्वे पोलीस वसाहत येथे रवाना झाली. त्यानंतर मी माझी गाडी रेल्वे वसाहत, रिक्षा स्टॅंड येथे येवून थांबविली. त्यावेळी माझे गाडीचे मागे असलेली वाहने ही रस्त्याच्या बाजुला कोणास संशय येणार नाही अशा स्थितीत पार्क करून पोलीस पथक कोणासही संशय येणार नाही असे थांबले. आम्ही येण्यापुर्वी तेथे उभे असलेले मनपा अधिकारी वरूडे यांनी माझेशी बोलुन थोडया वेळातच माझेकडून लाच स्विकारल्याने मी पोलीस पथकास नियोजित इशारा केला. तेव्हा पोलीस पथकाने सक्रीय होऊन मनपा अधिकारी वरूडे यांना लाचेच्या रकमेसह पंचासमक्ष ताब्यात घेतले.

तरी मनपा अधिकारी श्रीकांत वरूडे, कनि ठ अभियंता , इमारत व कारखाने विभाग, ''एन'' वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, घाटकोपर पूर्व, मुंबई–४०००७५ यांनी माझेकडे त्यांच्या पदाचा दुरूपयोग करून माझे घराच्या बांधकामाचे नि कासन न करण्यासाठी रू. ४०,०००/–लाचेची मागणी करून तडजोडी अंती रूपये १०,०००/– लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य करून ती लाच रक्कम स्विकारली तसेच खाजगी इसम अनिल कदम यांनी फिर्यादी यांना सांगितले की,एका रूमचे पाच हजार रूपये देतात. असे तुम्ही दोन रूमचे १०,०००/–हजार रू.देवून टाका मी तुमच्या दोघांमधला दुवा आहे असे सांगून तो फिर्यादी यांना प्रोत्साहन देत आहे म्हणुन माझी आलोसे श्रीकांत वरूडें व खाजगी इसम अनिल कदम यांचे विरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( जगदिश वळवी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

INSPECTOR OF POLICE
ANTI-CORRUPTION BUREAU
MUMBAI

Waakode

MISSIONER OF POLICE

सत्यमेव जयते

MUMBAI

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे — तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.....................................................................................................................

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मुल्य —————
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —————
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिकत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील लोकसेवक श्रीकांत वडके यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग करून कायदेशीर परिश्रम खेरीज फिर्यादी यांच्या शाळेच्या बांधकामाचे निष्कासन न करण्यासाठी रु. ४०,०००/- लाचेच्या रकमेची मागणी करून तडजोडी अंती रु. १०,०००/- ची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य करून स्विकारले. तसेच खाजगी इसम [illegible] यांनी फि. यांना दहा हजार रुपये लोकसेवक यांना देणेबाबत प्रोत्साहन दिले म्हणून गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

जगदिश वळवी, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.....................................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन —————, जिल्हा —————, राज्य —————.

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................................................. (3) Transferred to P.S ..................................
District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामुल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name जगदिश वळवी
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. —————

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख —————
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ............................

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

वरील फिर्यादी श्री नारायण उर्फ योगेश मनोहर वाकोडे, वय २५ वर्षे, धंदा- नाही, रा. ठि- रमाबाई कॉलनी, प्रकाश नगर, रूम नं ९८३, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०००७५ यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर अंगुलिखित करण्यात आली असून तिच्या गुन्ह्याची पहिली खबर म्हणून संबोधण्यात येत असून ती सोबत जोडण्यात आलेली आहे.

समक्ष

(जगदीश वळवी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई